आगामी प्रकाशन !!!!!!!!!!!!!!!

लवकरच प्रसिद्ध होत आहे....................

अमेरिका आणि कॅनडा येथील आपल्या अनिवासी मराठी लेखक/लेखिका यांच्या बद्दलचे आणि त्यांच्या लेखनाने सुशोभित केलेले पहिलेच मराठी संकलित पुस्तक...........

- मायबोलीचा विश्वसेतू -

श्री. दिवाकर कारखानीस, सौ. मोनाली फाटक आणि श्री. प्रमोद तेंडूलकर यांनी केलेला हा अभिनव उपक्रम अत्यंत कल्पक आहे.
महाराष्ट्राबाहेर गेली तीस/चाळीस वर्षे राहिलेली ही मराठी माणसे-- मायबोलीच्या प्रेमापोटी, आपल्या माणसांच्या आत्मियतेपायी मराठी भाषा जिवंत ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत राहिली आहेत. त्यांच्या उपजीविकेची क्षेत्रे वेगवेगळी आहेत. कुणी डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक,accountant तर कुणी सामाजिक कार्यात गुंतले आहेत पण तरी देखील त्यातल्या या सर्व व्यक्तींनी आपले मन मात्र मराठी भाषेतच मोकळे केले आहे.त्यात बरेच काही मिळवल्याचा अभिमान आहे, बरयाचदा आलेले वैफल्य आहे, अडचणींवर केलेली मात आहे, आपले 'मराठीपण' जपण्याची धडपड आहे, आपले विचार, आपली संस्कृती पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याची तळमळ आहे. कधी ते न जमल्याची खंतही आहे. कधी हे लेखन स्वान्तसुखाय आहे,तर कधी आपल्या लोकांना संदेश देणारेही आहे. बरयाचदा हे अनुभव अगदी खाजगी आहेत पण खूपदा ते सर्वांना 'आपलेच' वाटणारेही आहेत. हे लेखन केले गेले आहे ते केवळ 'मायबोलीच्या' जवलीकीतुनच. त्यात ना पैशांची आस आहे ना स्वतःचे नाव होण्याचा ध्यास. हे आहे एक हितगुज! मराठी मनाने....... मराठी मनाशी केलेले!
या सर्व तरल मनांना शब्दात बंदिस्त करण्याचा हा एक आगळा प्रयत्न या तीन संपादकांनी केला आहे. त्याचबरोबर प्रत्येक लेखकाचे लेखनही प्रसिद्ध करून त्यांच्या लेखनशैलीचे विविध पैलू वाचकांपुढे तर येतातच पण त्याचबरोबर या लेखकांनी पाहिलेले आणि जगलेले अनोखे जगही!
हा आहे एक प्रवास!! न्यूयॉर्कच्या स्वातंत्र देवतेच्या पायांपासून सुरु करून इंद्रधनुष्याचा हा विश्वसेतू पार करून महाराष्ट्रात जावून ज्ञानेश्वरांच्या पायांवर डोके ठेवण्याचा!!!!!!

मोनाली मोहन